




RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ








सोमवार, ३१ मार्च २०२५ | वर्ष : ५ | अंक : ९५ | दैनिक | किंमत : ₹५/-

Monday, 31 March 2025 | Year : 5 | Issue : 95 | Daily | Rate: Rs. 5/-


# हा तर विदर्भाच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रयत्न ...

**विकास मंडळे ही मागास भागांची कवच कुंडले आहेत, असे म्हणारा भाजप सत्तेवर येऊन तीन वर्षाहून अधिक काळ झाला तरी मंडळांना पुनरुज्जीवित करू शकला नाही.**




**नागपूर :** विकास मंडळे ही मागास भागांची कवच कुंडले आहेत, असे म्हणारा भाजप सत्तेवर येऊन तीन वर्षाहून अधिक काळ झाला तरी मंडळांना पुनरुज्जीवित करू शकला नाही, आता तर या मंडळावर भ्रष्ट अधिकाऱ्याची नियुक्ती करून सरकारने विदर्भाच्या जखमेवरच मीठ चोळले, अशी भावना व्यक्त केली जात आहे. केंद्राकडेच प्रलंबित आहे. शिंदेची अडीच वर्षे अशीच गेली, त्यानंतर आता फडणवीस मुख्यमंत्री झाले. अनेकदा हे नेते दिल्लीत जातात. पण मंडळाच्या पुनर्जीवनाबद्दल केंद्रीय नेत्यांशी साधी चर्चाही विदर्भ आणि मराठवाड्यासह इतर मागास भागाच्या विकासासाठी नेमलेल्या विकास मंडळाची मुदत सपून आता चार वर्ष होत आहे. मात्र केंद्र आणि राज्यात भाजपच्याच नेतृत्वाखाली सरकार असताना त्याच्या मुदतवाढीसाठी भाजपकडून प्रयत्न होताना दिसत नाही. शिंदेंच्या नेतृत्वात भाजपचे सरकार आले. विदर्भातील देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले, मंडळे मागासभागाची कवच कुंडले आहे, असे म्हणणारे सुधीर मुनगंटीवार वनमंत्री झाले. या सरकारच्या पहिल्याच मंत्रिमंडळाच्या बैठकीत विदर्भ विकास मंडळांसह इतर मंडळांना मुदतवाढ देण्याचा निर्णय झाला. याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्यात आला. तेंव्हपासून तो करीत नाही, यावरून विदर्भावरील भाजपचे प्रेम किती बेगडी आहे हे स्पष्ट होते. विदर्भ विकासाचा अनुशेष कायम असताना विकास मंडळ पुनर्जीवित होणे आवस्यक असताना त्याकडे सरकारचे दुर्लक्ष झाले आहे. आता या फक्त कागदावर अस्तित्वात असलेल्या मंडळाच्या सदस्य सचिवपदावर सरकारने भ्रष्ट अधिकारी शुभम गुप्ता यांची नियुक्तीकरून विदर्भाच्या जखमेवर मीठ चोळले आहे. गुप्ता हे गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास विभागात प्रकल्प अधिकारी असताना त्यांनी गाय वाटप योजनेत घोटाळा केला होता. त्यांची नंतर बदली झाली होती. त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही, त्यांना पुन्हा विदर्भात पाठवण्यात आले.

## प्रधानमंत्रींच्या दौऱ्यापूर्वीच विदर्भवादी स्थानबद्ध

**नागपूर :** स्वतंत्र विदर्भाच्या मागणीवर चर्चेसाठी वेळ न दिल्यास काळे झेंडे दाखवू, असा इशारा देणाऱ्या विदर्भवाद्यांना पोलिसांनी शनिवारी मध्यरात्रीपासूनच ताब्यात घेणे सुरू केले. माजी आमदार व कट्टर विदर्भवादी वामनराव चटप यांना रविवारी मोदींच्या आगमनापूर्वी स्थानबद्ध करण्यात आले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी रविवारी 330 मार्चला नागपूर दौऱ्यावर आहेत. या दौऱ्या दरम्यान स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसंदर्भात चर्चा करण्यासाठी विदर्भवाद्यांनी प्रधानमंत्री भेटण्याची इच्छा व्यक्त केली होती तसेच त्यासाठी वेळ द्यावा, अशी मागणी केली होती. पण प्रशासनाने ती नाकारली, त्यामुळे मोदींना काळे झेंडे दाखवण्याचा इशारा विदर्भवाद्यांनी दिला होता. या आंदोलनामुळे कायदा व सूव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून सुरक्षिततेच्या कारणास्तव पोलिसांनी शनिवारी मध्यरात्रपासूनच विदर्भवाद्यांना ताब्यात घेणे सुरू केले. सुनील चोखारे यांना अबांझरी पोलिसांनी मध्य रात्रीनंतर ताब्यात घेतले तसेच कट्टर विदर्भवादी नेते व माजी आमदार वामनराव चटप यांच्यासह 16 कार्यकर्त्यांना शनिवारी पहाटे पोलिसांना ताब्यात घेतले. त्यांना बर्डीत स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. अशाच प्रकार इतरही काही पोलीस ठाण्यात कार्यकर्त्यांना स्थानबद्ध केले, असे चटप यांनी सांगितले.

# न्यायासाठी संघर्षाची प्रेरणा देणारी दीक्षाभूमी : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी



**नागपूर :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी रविवारी नागपुरात आले. नागपूर विमानतळावर सकाळी 8:30 आगमन झाल्यावर मोदी थेट रेशिमबाग येथील संघ स्मृती मंदिर परिसरात गेले. यानंतर मोदी दीक्षाभूमीमध्ये गेले. दीक्षाभूमीमध्ये मोदी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीचे दर्शन केले. भगवान गौतम बुद्ध यांना मोदी यांनी नमन केले. मोदींनी दीक्षाभूमी येथे 15 मिनिटांचा कालावधी घालविला. यावेळी भदंत नागार्जुन सुरई ससाई यांच्यासह भंते उपस्थित होते. मोदी यांनी काही मिनिटे दीक्षाभूमी येथे ध्यानसाधना केली असल्याची माहिती आहे. मोदींनी दीक्षाभूमी भेटीबाबत एक संदेशही लिहिला. मोदी यांचा शाल देऊन स्मारक समितीने सत्कार केला. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. प्रधानमंत्री म्हणून मोदींची ही दीक्षाभूमीला दुसरी भेट आहे. प्रधानमंत्री यांचे स्वागत करण्यासाठी दीक्षाभूमी परिसरात मोठ्या संख्येत भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

**मोदी यांचा संदेश :** *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पंचतीर्थांपैकी एक असलेल्या नागपूर येथील दीक्षाभूमीला भेट देण्याचे सौभाग्य मिळाले, याचा मला अभिमान वाटतो. या पवित्र स्थळाच्या वातावरणात बाबासाहेबांचे सामाजिक समता आणि न्याय यांचे सिद्धांत प्रकर्षाने जाणवतात. दीक्षाभूमी आपल्याला गरीब, वंचित आणि शोषितांसाठी सन्मान, हक्क आणि न्यायासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा देते, असा संदेश मोदी यांनी दीक्षाभूमीबाबत लिहिला.*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध धम्माची दीक्षा घेतलेल्या दीक्षाभूमीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दुसऱ्यांदा भेट दिली. दीक्षाभूमीला दोनदा भेट देणारे आतापर्यंतचे ते पहिलेच पंतप्रधान आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वी 14 एप्रिल 2017 रोजी दीक्षाभूमीला पहिल्यांदा भेट दिली होती. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 126 वी जयंती होती. आता ते आठ वर्षांनी पुन्हा दीक्षाभूमीवर आले. दीक्षाभूमीवर प्रस्तावित भुयारी वाहनतळाला विरोध झाल्यानंतर सौंदर्यीकरण आणि विकास प्रकल्पाचे काम ठप्प पडले असतानाच प्रशासन मोदींच्या दीक्षाभूमी भेटीसाठी विशेष तयारी केली.

# व्लादिमीर पुतिन यांच्या ताफ्यातील आलिशान कारमध्ये मोठा स्फोट!



**नवी दिल्ली :** रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या यांच्या ताफ्यातील एका लक्झरी लिमोझीन कारमध्ये मॉस्को येथे भीषण स्फोट झाल्याचा प्रकार समोर आला आहे. द सनने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. या घटनेमुळे पुतिन यांच्या सुरक्षेबाबात चिंता व्यक्त केल्या जात आहेत. तसेच पुतिन यांच्या जिवाला रशियाच्या राजधानीतही धोका असल्याचे समोर आले आहे. दरम्यान ही कार जळून खाक होत असतानाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी पुतिन यांच्या आजारपणाच्या चर्चादरम्यान रशियाला युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्णायक धक्का बसू शकतो असे विधान केले होते त्यानंतर काही दिवसांतच हा स्फोट झाला आहे. रशियाबरोबर सुरू असलेल्या युद्धादरम्यान झेलेन्स्की यांनी काही दिवसांपूर्वी एक खळबळजनक दावा केला होता. 'व्लादिमीर पुतिन यांचा लवकरच मृत्यू होईल,' असे विधान झेलेन्स्की यांनी केले होते. त्यानंतर झालेल्या या स्फोटाने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# म्यानमारमधील भूकंपबळींची संख्या 1644

**भारतासह जगभरातून मदतीचा ओघ**



**नवी दिल्ली :** म्यानमारमधील 7.7 रिश्टर स्केलच्या भूकंपातील बळींची संख्या 1644हून अधिक झाली आहे. भूकंपानंतर कोसळलेल्या इमारतींच्या ढिगाऱ्याखाली अनेक लोकांचा मृत्यू झाला असून, मृतदेह बाहेर काढण्यात येत आहेत. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. म्यानमारमधील प्रशासनाने सांगितले की, 1600 नागरिकांचा मृत्यू झाला असून, 3408 नागरिक जखमी झाले आहेत, तर 139 जण बेपत्ता आहेत. अधिकृत आकडेवारी आणखी जमा केली जात आहे. भूकंपामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. मृतांचा आकडा मोठा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. म्यानमारमध्ये दीर्घकाळापासून नागरी संघर्ष सुरू असून, त्यामुळे अनेक समस्या येथे तयार झाल्या आहेत. भूकंपानंतरही काही भागांत लष्कराने हल्ले सुरू ठेवले आहेत. कायिन भागात भूकंपापेक्षा लष्कराच्या हल्ल्यांचाच तेथील नागरिकांना धोका आहे. म्यानमार आणि थायलंडला शुक्रवारी दुपारी भूकंपाचा मोठा हादरा बसला. अनेक ठिकाणी इमारती जमीनदोस्त झाल्या. राजधानी नेपिटॉ येथे वीजपुरवठा, टेलिफोन, इंटरनेट सेवा ठप्प आहे. कर्मचाऱ्यांनी काही ठिकाणी रस्ते नीट केले. मात्र, शहरातील काही भाग प्रशासनाने येण्या-जाण्यासाठी बंद केला आहे.

थायलंडमध्ये भूकंपामुळे बँकॉकला फटका बसला. बँकॉकमधील प्रशासनाने सांगितले की आतापर्यंत 6 जणांचा मृत्यू झाला असून, 26 जखमी झाले आहेत, तर 47 बेपत्ता आहेत. यातील अनेक जण बांधकाम सुरू असलेल्या इमारतींमध्ये काम करणारे कर्मचारी आहेत. बेपत्ता नागरिक जीवित असण्याची शक्यता मावळल्याचे चित्र आहे.


डिफेन्सचे सेवानिवृत्त अधिकारी, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीत क्रियाशील समाजसेवक, वाडी धम्मकीर्तीनगर निवासी



आयु. हरिदासजी कोसारे व सहचारिणी कांताबाई कोसारे

यांच्या 57 व्या विवाह दिवसाच्या स्नेहील मंगलकामना.







कुटुंबातील सर्वांची लाडकी परी 'प्रेरणा घनश्याम चव्हाण' हिला 12 व्या

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

*आपले प्रियजन*
समस्त कोसारे, खाकसे, चव्हान, जांभूळकर
व मित्र परिवार, नागपूर, पुणे, अलिबाग.


# ओडिशातील कामाख्या एक्स्प्रेसचे 11 डबे रुळावरून घसरले

**एकाचा मृत्यू 8 जण जखमी**

**ओडिशा :** ओडिशा राज्यात पुन्हा एकदा एका रेल्वेचा अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. कामाख्या एक्स्प्रेसचे 11 डबे रुळावरून घसरल्याची माहिती सांगितली जात आहे. ओडिशातील कटकजवळील नेरगुंडी रेल्वे स्टेशनजवळ बेंगळुरू-कामाख्या सुपरफास्ट एक्स्प्रेसचे 11 डबे रुळावरून घसरले आहेत. रविवारी सकाळी 11.54 वाजता ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर प्रवाशांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली होती. ही घटना घडल्यानंतर रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. तसेच प्रशासनाकडून मदतकार्य सुरु करण्यात आल्याचंही सांगितलं जात आहे. या घटनेनंतर अपघात मदत आणि वैद्यकीय मदत रेल्वे देखील घटनास्थळी रवाना करण्यात आली आहे. दरम्यान, कामाख्या एक्स्प्रेसचे 11 डबे रुळावरून घसरल्याच्या या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून 8 जण जखमी झाल्याची माहिती सांगितली जात आहे. तसेच कामाख्या एक्स्प्रेस रेल्वे रुळावरून घसरल्यामुळे अनेक एक्स्प्रेसचे मार्ग वळवण्यात आले आहेत. कामाख्या एक्स्प्रेसमधील प्रवाशांसाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. तसेच कामाख्या एक्स्प्रेस पुन्हा धावण्यासाठी योग्य दुरुस्तीचे काम सुरू असल्याचेही ईसीओआर अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

# अमेरिकेत परदेशी विद्यार्थी लक्ष्य!



**नवी दिल्ली :** अमेरिकेतील शेकडो आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे एफ-1 व्हिसा रद्द केल्यानंतर, अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने या विद्यार्थ्यांना स्वतः हून देश सोडण्याचे निर्देश देणारे ईमेल पाठवले आहे. या ईमेलमुळे विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसला आहे. कॅम्पस ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांना लक्ष्य करून सुरू केलेली ही कारवाई आंदोलनांमध्ये प्रत्यक्ष सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपेक्षाही अधिक कडक करण्यात आली आहे. देशविरोधी सोशल मीडिया पोस्ट शेअर करणारे, लाईक करणारे किंवा त्यावर कमेंट करणारे विद्यार्थ्यांची देखील चौकशी करण्यात येत आहे. यामुळे अमेरिकेतील परदेशी विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची चिंता निर्माण झाली आहे. दरम्यान ज्या विद्यार्थ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे, त्यामध्ये काही भारतीय विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. अमेरिकेत राजकीय पोस्ट शेअर केल्यानेही व्हिसा रद्द होऊ शकतो, अशी पुष्टी इमिग्रेशन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली आहे.

# गेवराई तालुक्यातील मशिदीत स्फोट

**स्फोटापूर्वी आरोपींनी जेलिटीनच्या कांड्यासह व्हिडिओ पोस्ट केला**



**बीड :** सरपंच संतोष देशमुख हत्याकांडासह विविध प्रकरणांमुळे गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्हा चर्चेत आहे. आता याच बीड जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. रमजान ईदच्या एक दिवस आधी बीडमधील एका मशिदीतस्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. गेवराई तालुक्यातील गढी-माजलगाव रोडवरील अर्धमसला गावातील मशिदीत शनिवार/रविवारी मध्यरात्री हा स्फोट झाला.

या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. विजय गव्हाणे आणि श्रीराम सागडे, असे दोन आरोपींची नावे आहेत. स्फोटापूर्वी विजय गव्हाणे याने सोशल मीडियावर जिलेटीनच्या कांड्यासह स्वतऱ्चा व्हिडिओ पोस्ट केला होता. हातात जिलेटिनच्या काठ्या आणि तोंडात सिगारेट घेऊन तो व्हिडिओ बनवत होता. उद्या रमजान ईद असल्यामुळे पोलिसांनी मुस्लिम समुदायाला शांत राहण्याचे आणि कुठल्याही अफवांवर विश्वासन ठेवण्याचे आवाहन केले आहे.

## वरिष्ठ पोलीस अधकाऱ्यांनी केला पंचनामा

रमजानच्या काळात मशिदीत असा स्फोट झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच बीड जिल्ह्याचे एसपी आणि छत्रपती संभाजीनगरचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी उपस्थित झाले आणि त्यांनी व्हिडीओग्राफीच्या माध्यमातून पंचनामा केला. आरोपींना शिक्षा व्हावी, अशी मागणी स्थानिकांनी केली.

## दोन आरोपींना अटक

गुढी पाडवा आणि ईद हे दोन महत्तवाचे सण असतानाच ही घटना घडल्यामुळे जिल्ह्यासह राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. मध्यरात्री 2.30 च्या सुमारास जिलेटिनच्या कांड्या ठेवून स्फोट उघडवून आणल्यामुळे मशिदीची भिंत कोसळली, तसेच मोठा खड्डाही पडला. सुदैवाने या सौम्य स्फोटात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, घटनास्थळी आयजी, पोलीस अधीक्षकांसह तलवाडा पोलीसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.


# बहुजन सौरभ

वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो, तुम्हीपण वाचा!



११ एप्रिल राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, १४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व ५ एप्रिल सम्राट अशोक

यांच्या संयुक्त जयंतीप्रित्यर्थ

आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.

## जाहिरात दरपत्रक

| | | |
|---|---|---|
| पान एक सप्तरंगीन | पूर्ण पान | ६० हजार रूपये |
| | अर्ध पान | ३० हजार रूपये |
| | पाव पान | १५ हजार रूपये |
| अंतिम पान सप्तरंगीन | पूर्ण पान | ५० हजार रूपये |
| | अर्ध पान | २५ हजार रूपये |

**शुभेच्छा जाहिरात २००० रू. पासून**

:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::

१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ, वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे, तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर-४४००२४

मेल -bahujansaurabh@gmail.com

संपर्क - 7020149291, 9422860648, 9421588901

## संपादकीय

# बांग्लादेशकडून भारत अदखल

भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित होणे हे बांग्लादेशच्याच हिताचे आहे. पाकिस्तान आणि बांग्लादेशच्या नादी लागून भारताशी वैर पत्करणे म्हणजे स्वतःच स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेणे हे बांग्लादेशने लवकरात लवकर समजून घ्यायला हवे. कारण पाकिस्तान आणि चीन हे कधीही कोणाचे मित्र होऊ शकत नाही. जिथे फायदा तिथेच मैत्री असे या दोन्ही देशांचे धोरण आहे. आशिया खंडातील भारतचे वर्चस्व कमी करण्यासाठी हे दोन देश बांग्लादेशचा वापर करून घेत आहेत. उद्या यांची गरज संपली की हे देश बांग्लादेशला वाऱ्यावर सोडून देतील तेव्हा बांग्लादेशची अवस्था ना घर का ना घाट का अशी होईल. त्यामुळे बांग्लादेशने आताच सावध होऊन भारताशी पुन्हा मैत्रीचे संबंध प्रस्थपित करायला हवे. 1971 पर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग होता. तेंव्हा त्याला पूर्व पाकिस्तान असे म्हंटले जायचे. पाकिस्तानच्या राजवटीत बांगलादेशातील नागरिकांवर अनन्वित अत्याचार होत होते. बांगलादेश हा पाकिस्तानचा घटक असूनही बांगलादेशी नागरिकांवर पाकिस्तान जुलुम करत होता. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीला कंटाळून बांगलादेशचे तात्कालिन नेते शेख मुजिबिर रहेमान यांनी पाकिस्तानी सरकारविरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या या बंडास बांगलादेशी नागरिकांनी प्रतिसाद दिला आणि लोक रस्त्यांवर उतरले. मात्र पाकिस्तानने दडपशाही मार्गाने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला, तेव्हा शेख मुजीबिर रेहमान यांनी भारताच्या तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्याकडे मदतीची याचना केली. इंदिरा गांधी यांनी तत्काळ बांगलादेशी नागरिकांना पाठिंबा दिला आणि भारतीय लष्कराने पाकिस्तानशी मुकाबला करून बांग्लादेशला पाकिस्तानच्या गुलामीतून मुक्त केले. पाकिस्तानच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा आहे. नव्हे भारतामुळेच बांग्लादेशची निर्मिती झाली आहे. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाल्यापासून बांगलादेश आणि भारताचे संबंध मैत्रीचेच राहिले आहेत. मोठ्या भावाच्या रुपात भारताने बांग्लादेशला नेहमीच त्यांच्या संकटात मदत केली. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बांग्लादेश मधील सध्याचे सरकार आणि बांग्लादेशी नागरिक भारताच्या उपकाराला विसरली असून भारतालाच शत्रू मानू लागली आहेत. बांग्लादेशात सद्या भारताविरुद्ध मोठा जनक्षोभ पाहायला मिळत आहे. बांग्लादेशच्या माजी प्रधानमंत्री शेख हसीना यांचे सरकार पाडून तेथील कट्टरपंथीयांनी सत्ता हस्तगत केली. कट्टरपंथीय, लष्कर आणि जनतेचा रोष पाहून शेख हसीना यांनी भारतात पलायन केले. शेख हसीना यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते. म्हणूनच भारताने त्यांना भारतात आश्रय दिला. कदाचित हेच तेथील नवनियुक्त सरकारला आणि कट्टरपंथीयांना रुचले नसावे. म्हणूनच त्यांनी बांग्लादेशातील हिंदू अल्पसंख्यांक नागरिकांना लक्ष करण्यास सुरुवात केले. गेल्या काही महिन्यात बांग्लादेशातील हिंदू मंदिरांवर आणि हिंदू नागरिकांवर हल्ले होऊ लागले. मागील काही महिन्यात बांग्लादेशात हिंदूवरील हल्ल्याच्या 300 घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव देखील गमवावा लागला आहे. हिंदूच्या मंदिरावर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूनी बांग्लादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ. मोहंमद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे. किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांग्लादेशातील अल्पसंख्याक हिंदूचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे. मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांग्लादेशात भारत विरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ. मोहंमद युनुस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांची बांग्लादेशचा हंगामी प्रधानमंत्रीपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागत केले होते. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती. मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. त्यांच्या कारकीर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे वाटले होते. पण त्यांनी मात्र भारताशी पंगा घेण्याचेच ठरवले आहे. भारताने केलेले उपकार बांग्लादेश आता विसरला आहे. म्हणूनच भारताच्या प्रधानमंत्रींना त्याची पुन्हा आठवण करून द्यावी लागली. 26 मार्च 1971 रोजी बांग्लादेशची निर्मिती झाली. या घटनेला यावर्षी 55 वर्ष पूर्ण झाली. बांग्लादेशात त्यांचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षीही तो तसा साजरा करण्यात आला. दरवर्षी बांग्लादेश स्थापना दिनी बांग्लादेशचे प्रधानमंत्री देशवासीयांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा देताना बांग्लादेश निर्मितीत भारताने केलेल्या मदतीचे स्मरण करून भारताचे आभार मानतात. मात्र यावेळी प्रथमच बांग्लादेशने भारताचे आभार मानले नाही. इतकेच नाही तर बांग्लादेश निर्मितीत भारताने दिलेल्या योगदानाची साधी दखलही घेतली नाही. हे पहिल्यांदाच घडले आहे. ■ ■

बहुजन सौरभ

---

# महाड चवदार तळे म्हणजे पिकनिक पॉईंट नाही, प्रेरणादायी इतिहास

**इतिहास वाचला तर इतिहास घडविता येतो असे म्हणतात. मग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 20 मार्च 1927 रोजी महाडच्या चवदार तळ्यावर समताधिष्ठित बहुजन समाजासाठी सत्याग्रह केला.**

यंदा या सत्याग्रहाला 98 वर्ष पूर्ण झालेत. महाडचा रणसंग्राम हा केवळ पाण्यासाठी नव्हता तो मानवी मूलभूत हक्कांसाठी होता. डॉ. बाबासाहेब त्या वेळी सांगत होते चवदार तळ्याचे पाणी प्यायल्याने आम्ही अमर होऊ अशातला भाग नाही. आज पावेतो चवदार तळ्याचे पाणी प्यायलो नव्हतो तर तुम्ही-आम्ही काही मेले नव्हतो. चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ त्या तळ्याचे पाणी पिण्याकरीता जावयाचे नाही. तर इतरांप्रमाणे आम्हीही या समाजातील माणसे आहोत हे सिद्ध करण्याकरीताच त्या तळ्यावर आपणास जावयाचे आहे.' असे अंगावर शहारे आणणारे उद्गार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 20 मार्च 1927 रोजी चवदार तळ्याच्या ऐतिहासिक सत्याग्रह आंदोलनाच्या वेळी काढले होते. त्याला 20 मार्च 2025 ला 98 वर्षे पूर्ण झालीत. पण त्या सत्याग्रहचा आंबेडकर अनुयायांनी कोणती प्रेरणा घेतली हा संशोधनाचा विषय आहे. आमच्यात संघटनात्मक कोणता बदल झाला? यांचे आत्मचिंतन आणि परीक्षण करण्याची तयारी आंबेडकरी चळवळीतील नेत्यात आणि अनुयायात असावी. इतिहास वाचला तर इतिहास घडविला येतो असे म्हणतात. मग आम्ही इतिहास घडवितो की भूगोल करतो? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांचा जाहीरपणे खुन करणे हा आंबेडकर अनुयायीचा जन्मसिद्ध अधिकार आहे असेच ते वागतात. 14 एप्रिल 1891 ते 06 डिसेंबर 1956 या काळात जे जे ऐतिहासिक कार्य डॉ. भिमराव आंबेडकर यांच्या हातून घडले. त्या त्या दिवसाला आंबेडकरी अनुयायी लाखोच्या संख्येने एकत्र येऊन जाहीरपणे क्रांतिकारी विचाराचा त्याच ठिकाणी खून करून तो उत्सव खूप मोठ्या प्रमाणात साजरा करतात. कारण तो दिवस त्याच्यासाठी खूप महत्वाचा असतो. कारण त्याच दिवशी गल्लीबोळातील नेत्याचा 8 × 10 चा बॅनर, होडींग आणि 10 × 12 चा स्टेज बांधून जनतेला आपली शक्ती दाखविण्याची सुवर्ण संधी मानतात. ती संधी गमवायला कोणीच तयार नसते. या दिवसाचे त्या काळाचे महत्व आज आमच्यासाठी काय आहे. हे आम्हाला विचारण्याचे, सांगण्याचे धाडस कुणी करू नये. आम्हाला आंबेडकर अनुयायी, भक्ताएवढे तुम्हाला त्याचे महत्व कळणार नाही. आमच्या रक्तात आंबेडकरी चळवळ असते. जन्मतःच आम्ही आंबेडकरवादी असतो. 20 मार्चला लाखो लोक महाडला जातात आणि काय करतात? 20 मार्च 1927 चे गांभीर्य कोणत्या गटाच्या नेत्याकडे असते. किंवा नगरा नगरातील मंडळ, महिला मंडळाकडे असतो काय? हे प्रत्येकांने आत्मचिंतन करावे.

महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील गांवकुसाबाहेर राहणारी महार फक्त महार माणसे महाडला पाणी पिण्यासाठी जाणार नव्हते. तरी डॉ. बाबासाहेबांनी महारांना पिण्याचे पाणी खुले करण्यासाठी महाडचा सत्याग्रह केला आणि महाडचे चवदार तळे अजरामर झाले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या सत्याग्रहामुळे, महाडच्या चवदार तळ्याच्या ऐतिहसिक सत्याग्रहाला आज 20 मार्च 2025 ला 98 वर्ष पूर्ण होत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आजच्याच दिवशी 20 मार्च 1927 साली चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि तळ्याचे पाणी सर्व मानवजाती साठी खुले केले. केवळ महार जातीसाठी चवदार तळे नव्हते. डॉ. बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचाराने चवदार तळ्याच्या पाण्याला हात लावताच आग लागली. ती महाडमध्ये सुरु झाली आणि राज्यातून देशभर पसरली. ते क्रांतिकारी वैचारिक संघटन कैशल्य आज कोणत्याही नेत्याकडे नाही. त्या ऐतिहसिक घटनेला 98 वर्ष पूर्ण होत असले तरी नेहमी सारखे कार्यक्रमाचे आयोजन महाडला असणार आहे. लोक एकदिवसाची पिकनिक म्हणून उत्साहात साजरी करणार, काही लोक चवदार तळ्याचे पाणी बॉटलमध्ये भरून घरी घेऊन जाणार. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समताधिष्ठित समाजनिर्मिती करण्यासाठीच अहोरात्र प्रयत्न केले. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी महाड मुक्कामी चवदार तळे सत्याग्रह आंदोलन केले. डॉ. बाबासाहेबांच्या मते, राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक बाबतीत समतेचे तत्त्व लागू करणे म्हणजे समाजरचनेतील नीतीच्या पायावर उभे राहण्यासारखे आहे. परंतु घुबडाला सूर्यप्रकाश सहन होत नाही. त्याप्रमाणे सामाजिक विषमतेमुळे ज्यांना जाती श्रेष्ठता मिरवायला मिळते त्यांच्या जातीभेदावर कुऱ्हाड पडलेली पाहून साहजिकच त्यांचा संताप तीव्र होतो. आज ही खेड्या पाड्यातील वातावरण त्याची साक्ष देते. बौद्ध समाजाच्या तरुणाने मराठा समाजाच्या मुलीवर प्रेम केले त्यांचा खून केला जात आहे. तर काही ठिकाणी संशय आला म्हणून घरात कोंडून निर्दयीपणे मारल्या जाते. एवढे भयानक विष यांच्या मनातील मेंदूत भिनले आहे. त्यातून खेड्यात राहणारा समाज बांधव काही शिकायला तयार नाही. संघटित राहाल तर कोणी अन्याय, अत्याचार करतांना शंभर वेळा विचार करेल. हे 1927 सालीच सांगितले होते 'खेडे सोडा, शहर गाठा', स्वतःची वसाहत बनवा. त्यातूनच आपले लोकप्रतिनिधी निवडून येतील. पण क्रांतिकारी संदेशातून आंबेडकरी चळवळीचे नेते अनुयायी काही शिकायला तयार नाही.



सागर रामभाऊ तायडे
मो. 9920403859

आज देशात जातीभेदाचा जो काही प्रकार अनुभवयास मिळत आहे. तो अत्यंत निंदनीय आणि संतापजनक आहे. जातीपातीच्या विषारी झाडाला केवळ उच्चवर्णीयांकडूनच खतपाणी घातले जाते, असे म्हणणे चुकीचे ठरेल. जोपर्यंत एका समाजाकडून दुसऱ्या समाजात रोटी-बेटी व्यवहार होत नाही तोपर्यंत समताधिष्ठ समाजाची निर्मिती अशक्य आहे, असे डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेले असताना ही अनेक वेळा बौद्ध आणि नवबौद्ध समाजातील लोकांचा विवाहाच्यावेळी जातीलाच अग्रक्रम असतो.





महाडच्या रणसंग्राम भूमीच्या संपूर्ण कोकणात मातृसंस्था आणि पंचायत यातील गावकी भावकीच्या कथा तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या तथागत बुद्धाच्या धम्माच्या चैकाटीत न सुटणाऱ्या आहेत. एकीकडे बाबासाहेबांचे स्वप्न साकार करायचे असा टेंभा मिरवायचा आणि दुसरीकडे वेळ येताच जाती-पातीला खतपाणी घालायला लावणारी कामे करायची अशी दुटप्पी भूमिका डॉ. बाबासाहेबांना मानणाऱ्या सुशिक्षित वर्गाने सोडून द्यायला हवी. त्यापेक्षा खेड्यातील अज्ञानी, अशिक्षित, असंघटीत कष्टकरी माणूस आंबेडकरी चळवळी करिता लाख मोलाचा ठरतो. आंबेडकरी चळवळीला मानणाऱ्या समाजाने स्वतःचे आत्मपरिक्षण करून डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या महाडच्या रणसंग्रामतून योग्य बोध घ्यावा. महाड चवदार तळे म्हणजे पिकनिक पॉईंट नाही. तर एक क्रांतिकारी प्रेरणादायी स्मारक आहे. या सत्याग्रहात ज्यांनी ज्यांनी सहभाग घेतला त्या सर्व ज्ञात अज्ञात क्रांतिवीरांच्या निष्ठा, त्याग आणि जिद्दीला कोटी कोटी प्रणाम. ■ ■

---

# पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकारणातून नैतिकता हद्दपार

**देशाच्या तुलनेत महाराष्ट्रच हे एक असे राज्य आहे की, ही पुण्यभूमी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे, भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख या व इतर महामानवांची जन्मभूमी आहे, त्यामुळे त्यांच्या विचारांना अभिप्रेत असलेली पुरोगामी विचारधारा ही महाराष्ट्राला लाभलेली वैचारिक देन आहे.**

सोबतच ही पावनभूमी वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, संत तुकोबा व अनेक थोर संत महात्म्यांची जन्मभूमी सुद्धा असल्याने त्यांनी आपल्या प्रबोधनातून महाराष्ट्र सक्षमपणे वैचारिक परीवर्तनाच्या दिशेने वळवला, त्यामुळेच महाराष्ट्र राज्य आज धार्मिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या इतर राज्यांच्या तुलनेत पुढारलेले राज्य समजण्यात येते. परंतु सद्यःस्थितीत महाराष्ट्र सुद्धा कधी नव्हे इतका विविध विध्वंसक कारनाम्यांनी प्रसिद्धीच्या झोतात येत आहे, ही राज्यातील जनतेला चिंतेत टाकणारी बाब ठरत आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांची 9 डिसेंबर 24 रोजी अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली तेव्हापासून महाराष्ट्रातील जनजीवन विस्कळित होऊन राजकारण तापलेले असतांना, सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील आरोप प्रत्यारोपाला उधाण आले आहे. या घटनेचे पडसाद देशभर पसरले असून, सर्व दृष्टीने संपन्न असे महाराष्ट्र राज्य सुद्धा गुन्हेगारीबाबत बिहारच्या वाटेवर मार्गक्रमण करीत आहे की काय, अशी जनमाणसात चिंता वाटायला लागली आहे. या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय वरदहस्तांकडून चालविण्यात येत असलेले अनधिकृत व्यवसाय, गुंड टोळ्याकडून खंडणी वसुली आणि इतर चालणारे दृश्य अदृश्य धंदे हे पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह तसेच त्यांची हतबलता उजागर करणारे आहेत. असे असतांना त्या जिल्ह्यातील मंत्री पदावर असलेल्या धनंजय मुंडे यांच्यावर दरदिवशी नवनवीन आरोप करण्यात येत आहेत आणि सरकारने त्यांचा तात्काळ मंत्रीपदाचा राजीनामा घ्यावा अशी अनेकांनी मागणी रेटून धरली आहे.



रतन तायडे
मो. 9420125761

परंतु जो कोणी आरोप केला तो सिद्ध झाल्याशिवाय राजीनामा मागणार नाही ही सत्ताधाऱ्यांची भूमिका तर, वरिष्ठांनी सांगितल्याशिवाय राजीनामा देण्याचा प्रश्नच येत नाही, ही मंत्री धनंजय मुंडे यांची भूमिका आहे, तर दुसरीकडे दिवसेंदिवस पुरवाव्यात वाढ होत आहे. पोलिसांनी आरोपी पकडून आणने व त्यांच्यावर कायदेशीर गुन्हे नोंदविणे हे त्यांनी आपले कर्तव्य बजावल्यानंतर आरोप सिद्ध होणे, न होणे ही माननीय न्यायालयाच्या अखत्यारितील बाब असल्याने साहजिकच त्या प्रक्रियेसाठी कालावधी लागतोच. तसेही न्यायालयीन प्रक्रियेतून आरोप सिद्ध झाल्यास राजीनामा मागितला जाईल अथवा धनंजय मुंडे स्वतः देतीलसुद्धा. परंतू सतत होणाऱ्या आरोपावरून नैतिक जबाबदारी





स्वीकारून राजीनामा देण्याची शक्यता नाही. हे दिसून येत असले तरी ज्यांच्यावर आरोग्य केल्या जातो ती व्यक्ती महत्त्वाच्या संविधानिक पदावर असतांना, पोलिस प्रशासन खरेच निकोप व निष्पक्षपणे चौकशी करू शकणार का हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तीचा राजीनामा घेणे आवश्यक ठरते. परंतू तसे न करता आरोप सिद्ध होण्याची अथवा न सिद्ध होण्याची वाट पाहत राहणे यातच संशयाला बळ मिळत असल्याचे दिसून येते. खासदार, आमदार असो की मंत्री यांनी नैतिकता पाळणे अत्यंत गरजेचे असते. कारण, ते लोकप्रतिनिधी असतात. त्यामुळे अशा प्रतिष्ठित लोकांकडून लोकांच्या मागणीला दाद देणे त्यांचे कर्तृत्वच आहे. मात्र आपल्या सोयीनुसार वक्तव्य करणे व वेळकाढू धोरण अवलंबिणे ही बाब शंकेला जन्म देत असते.

या प्रकरणात सर्व एकाच आशयाचे वक्तव्य करीत आहेत. त्यातून एकाने जरी तोंड उघडले तरी, इतरांना ते घातक ठरणार आहे. काही छोटे मासे जाळ्यात अडकले. परंतु मोठे मासे अजूनही बाहेर पाण्यात हेलकावे खात आहेत. एकदाचे ते जाळ्यात आले की संपूर्ण प्रकरणाला वेगळीच कलाटणी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तूर्त नैतिकता जबाबदारी स्वीकारून यापूर्वी माजी मुख्यमंत्री एन. आर. अंतुले, आर. आर. पाटील, विलास देशमुख, अनिल देशमुख, संजय राठोड, अशोक चव्हाण, अजित पवार, छगन भुजबळ, एकनाथ खडसे, नवाब मलिक, शिवराज पाटील चाकूरकर, शिवराज पाटील निलंगेकर यासह अनेकांनी राजीनामा दिल्याची माहिती आहे. यावरून तेव्हा नैतिकता जिवंत होती आणि आता मृतःप्राय झाली की काय? या धोरणाबाबत सत्ताधाऱ्यांविरोधात राज्यातील जनतेत तीव्र संतापाची भावना दिसून येत आहे. शेवटी 'सत्यमेव जयते' अर्थात सत्याचाच विजय होत असतो, या न्यायाने गुन्हेगार कितीही आणि कुठेही लपण्याचा प्रयत्न करणार असतील तर ते कधीतरी पकडले जातीलच. तेव्हा आजचे संभावित असलेले व आरोप निराधार असल्याचे वक्तव्य करणारे महाभाग काळ्याकुट्ट कपड्यात तोंड लपवतील, एवढे मात्र निश्चित! ■ ■

---

## बहुजन मानस





नागेश चौधरी ( बहुजन विचारवंत )
9970873560

# 'या देशात' कुणीही ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य व शूद्र नाही

**रुग्वेदाच्या पुरुष सुक्तात चातुर्वर्ण्याची नोंद आहे आणि नंतरच्या आर्यांच्या अनेक धर्म पुस्तकात पुन्हा पुन्हा सांगण्यात आले. चातुर्वर्ण्य विराट पुरुषाच्या शरीरातून निर्माण झाले अशा प्रकारची नोंद वेद, स्मृती इत्यादी मध्ये आहे आणि दुसरीकडे हेही सांगितले जाते की वेद अपौरुषेय आहेत. म्हणजे विराट पुरुषापासून चातुर्वर्ण्य निर्माण झाले असे वेदात आहे आणि वेद अपौरुषेय आहे हेही सांगितले आहे. हे काय गौडबंगाल आहे?**

यावरून आणि वेद आणि अपौरुषेयता ही ताळमेळहीन कल्पना आहे हेच स्पष्ट होते. दुसरे म्हणजे चातुर्वर्ण्याचा वैज्ञानिक दृष्ट्या विचार केला तर लक्षात येते की त्या तथाकथित विराट पुरुषाच्या मुखातून ब्राह्मण, भुजातून क्षत्रिय आणि मांड्यातून वैश्य आणि पायातून शूद्र निर्माण झाले हे कसे शक्य आहे?

आजच्या एखाद्या बालकाला वा बालबुद्धीच्या माणसाला देखील हा प्रकार मुर्खपणा वाटेल. कारण आजवर एकही ब्राह्मण मुखातून निर्माण झाला नाही, एकही क्षत्रिय भुजातून किंवा बाहूतून निर्माण झाला नाही. एकही वैश्य मांडीतून निर्माण झाला नाही आणि एकही शूद्र पायातून निर्माण झाला नाही. सर्व माणसे स्त्रीपासूनच बाळंत होतात, हेच फक्त सत्य आहे.

परंतु या चातुर्वर्ण्यामध्ये स्त्रीचे अस्तित्व कुठेही नाही. कारण चारही वर्णांची उत्पत्ती पुरुषापासून दाखवली आहे.

हा निसर्ग आणि विज्ञान विरोधी मूर्खपणा आहे.

**वर्ण गर्व** – ही उत्पत्ती मान्य केली तर आज जगामध्ये, पृथ्वीच्या पाठीवर एकही ब्राह्मण अशा प्रकारे मुखातून जन्म घेतलेला नाही.

ते स्वतःला खोटेपणाने ब्राह्मण म्हणवतात. कारण अनेक पिढ्यांपासून तसे संस्कार, तसे खोटे विचार त्यांच्या डोक्यात घुसवण्यात, बसवण्यात आले. म्हणून चातुर्वर्ण्यय मानणे हे तद्दन मूर्खपणाचे आहे. तीच बाब बाकी वर्णांची आहे. म्हणून मी क्षत्रिय आहे, आणि मी वैश्य आहे आणि म्हणणे सुद्धा अज्ञानता आणि अविचार आहे.

**शूद्र** – आम्ही शूद्र आहो असे कुणीही गर्वाने म्हणत नाही. कारण चातुर्वर्ण्याच्या उतरंडीत शूद्र हे सर्वात खालच्या स्थानी आहेत, पायात आहेत.

**निसर्ग आणि विज्ञान विरोधी षडयंत्र** – पायातून किंवा मांड्यातून किंवा तोंडातून जन्म घेणे याचा अर्थ त्या-त्या अवयवांना योनी होती? असे मानणे आहे. तिथे-तिथे गर्भधारणा होत होती आणि त्यातून ते निर्माण झाले असा त्याचा सरळ अर्थ आहे. परंतु तो अर्थ न पटणारा असल्यामुळे ते याबाबतीमध्ये स्पष्टीकरण देत नाहीत, ती कल्पना आहे आणि ती कल्पना तद्दन मूर्खपणाची आहे हे पण ते मान्य करत नाहीत. जात व्यवस्था देवाने निर्माण केली असे म्हटले जाते असेही दामटून देतात. आणि हा देव कोणता हे पण ते सांगत नाहीत. म्हणजे वाटेल ते सांगणे, डोक्यात आले ते सांगणे आणि त्याचा देवाशी संबंध जोडणे हा जो प्रकार आहे, हा जगामध्ये इतरत्र नाही. म्हणून त्यातूनही एक लबाडी आहे, मूर्खपणा आहे हे कुणालाही पटण्यासारखे आहे.

हे म्हणतात ब्रह्म जाणे तो ब्राह्मण म्हणजे जो ब्रह्माला जाणतो तो ब्राह्मण आहे. आता ब्रह्माला जाणणे म्हणजे काय तर यासाठी ज्या काही अटी आहे त्या अटीमध्ये आज स्वतःला ब्राह्मण म्हणवणारे बसतात का? आज जे लोक संघाचे मुखंड आहेत किंवा संघा पासून जो भाजप निर्माण झालेला आहे त्या भाजपमध्ये किंवा संघामधले लोक त्यांच्याच पुस्तकांमध्ये जे गुणधर्म सांगितले आहेत त्या गुणधर्माचे ब्राह्मण आहेत का? ते ब्रह्म जाणणारे आहेत का? मोहन भागवतांना ब्रह्मजाणते म्हणता येणार का? म्हणजे मोहन भागवत असेल गोळवलकर असेल, हेडगेवार असेल हे सगळे लोक ब्रह्म जाणणारे होते का? म्हणजे काय लिहायचे आणि कसे वागायचे याचा काही संबंध नाही. आज कुणीही ब्राह्मण ब्रह्म जाणणारा दिसत नाही.







आणखी असे म्हणतात की, जन्मना जायते शूद्र - संस्कारात द्विज उच्चते याचा अर्थ हा होतो की जन्मतः सगळे शूद्र आहेत आणि संस्कार केल्यावर द्विज म्हणजे ब्राह्मण होतात. म्हणजे सगळे पायातून जन्म घेतात असे म्हणण्यासारखे आहे की नाही? स्त्रीपासून, आईपासून जन्म घेण्याला महत्व न देता आईला, मायला शूद्र समजून वागतात. ज्यांचा आईपासून जन्म त्यांना मग पायातून जन्म झाला म्हणता कामा नये. या मधला खोटेपणा देखील या लोकांना कळत नसेल असे म्हणता येत नाही. परंतु कळून देखील केवळ स्वार्थासाठी खोटेपणाच्या भूमिकेतून स्वतःला ब्राह्मण वगैरे म्हणवतात.

ब्राह्मण असण्याचे जे काही गुणधर्म असतात ते तरी आजच्या ब्राह्मणामध्ये दिसतात का? ते खोटे बोलत नाही का, ते भ्रष्टाचार करत नाही का? ते सत्याने वागतात ते न्यायाने वागतात हे कुणाचाही द्वेष करत नाही ते कुणालाही शत्रू म्हणत नाही अशा प्रकारची वागणूक ज्यांची असेल ते श्रेष्ठ वागणुकीचे लोक ब्राह्मणाचे गुणधर्म आहेत असे सांगतात. त्यांच्यामध्ये तरी ते गुणधर्म आहेत का? असे जर नाही तर मग देशामध्ये कोणी ब्राह्मण आहे याचे उत्तर नकारार्थी आहे.

कुठलेही गुण नसताना कसल्याही प्रकारे मिळतात सांगितल्याप्रमाणे विविध शरीराच्या भागातून जन्मणारे हे असत्य असताना ते नाव घेणे तर आहेस परंतु अडाणीपण आहे, अज्ञान आहे.

**क्षत्रियत्व?** – दुसरे हे की जे स्वतःला क्षत्रिय समजतात ते देखील जर भुजातून जन्मले असेल तर ते देखील विकृतीला मानतात. भुजातून जन्म न होताच ते स्वतःला क्षत्रिय म्हणतात का? त्याचा गर्व वाटतो का? क्षत्रियत्वाचा गर्व वाटणे म्हणजे एक प्रकारे ब्राह्मणांनी सांगितलेली उत्पत्ती मान्य करणे आहे. जिथे ब्राह्मण अस्तित्वात नाही.

अस्तित्वात नाही तिथे क्षत्रिय तरी अस्तित्वात आहेत का? वेदांमध्ये सांगितल्याप्रमाणे कुठल्या क्षत्रियाचा बहुतून जन्म झाला आहे? त्या सगळ्यांचा जन्म केवळ स्त्रीपासून होत असेल तर स्वतःचा वर्ण ब्राह्मण व क्षत्रिय कसा काय सांगू शकता?

दुसरे म्हणजे ज्यांना आम्ही वैश्य आहोत मारवाडी वगैरे वाटते, हे वैश्य देखील खोटेपणा नाही का? त्यांचा जन्म देखील मांडीतून झाला म्हणतात आणि मांडीपासून जन्म होणे किंवा पाया पासून जन्म होणे ही लबाडी मान्य करणे म्हणजे आज एकविसाव्या शतकात मूर्खपणा जपणे आहे. अडाणीपणा जपणे आहे.

आणि ह्या चातुर्वर्ण्याच्या उत्पत्ती मध्ये देखील त्यांना आपल्या बुद्धीचा गर्व वाटतो. जे लोक स्वतःला ब्राह्मण म्हणतात, ते जर ब्राह्मणाची उत्पत्ती खरी मानतात तर ते किमान अक्कल असलेले तरी आहेत का हा प्रश्न आहे. आज ते आम्ही तोंडातून जन्मलो असे म्हणतात का? तरीही ते चातुर्वर्ण्य मान्य करत असतील तर ते अक्कल शून्य आहेत हे स्पष्ट आहे. आणि म्हणून आज जे काही लोक समजतात, मानतात की ब्राह्मण बुद्धीमान असतात वा त्यांच्यात मेरिट आहे असे मानणे देखील विकृतीला मेरिट समजणे आहे. कुठलीही जात, कुठलाही वर्ण ब्राह्मणांपासून शूद्रा पर्यंत सर्व काल्पनिक आहेत, खोटे आहेत. वर्णाची लक्षणे शरीरामध्ये नसतात. ती त्यांची भूमिका असते, विचार असतात आणि हे विचार असणे म्हणजे एक विकृती जपणे आहे. कारण जे नाही, जे असत्य आहे त्याला सत्य म्हणणे, तेच खरे आहे म्हणणे म्हणजे मूर्खपणाचे उदात्तीकरण करण्यासारखे आहे. त्यांच्याच तथाकथित पुस्तकांमध्ये ब्राह्मणांचे जे गुण वा लक्षणे सांगितली आहे ती आजच्या किती ब्राह्मणांत दिसतात?

**ब्राह्मण गुण** – शांति, आत्म-संयम, तपस्या, पवित्रता, सहिष्णुता, ईमानदारी, बुद्धि, ज्ञान आणि धार्मिकता - हे त्यांचे स्वाभाविक गुण आहेत ज्या प्रमाणे ब्राह्मण कार्य करतात.

दुसऱ्या ठिकाणी म्हटले आहे -मानसिक संतुलन, इंद्रिय संयम, तपस्या, शुचिता, सहनशीलता, सरलता, वैराग्य, सैद्धांतिक और व्यावहारिक ज्ञान, संतोष, सत्यनिष्ठा और वेदों में दृढ़ विश्वास -

ये ब्राह्मण के बारह गुण हैं।

हे त्यांनीच सांगितलेले गुण वा लक्षणे असलेले ब्राह्मण कोण आहेत?

अगदी हेडगेवार, सावरकर, गोळवलकर, मोहन भागवत या संघ-हिंदू सभावाद्यांपासून अलिकडच्या अटल बिहारी वाजपेयी, गडकरी, फडणवीस किंवा जे कुणी राजकीय सत्तेत आहेत त्यांच्यात ही लक्षणे आणि सद्गुण आणि तसे आचरण आहे का, दिसते का? तरीही ते ब्राह्मण आहेत की केवळ सर्व सामान्यांप्रमाणे सबगुणी वा गुणी अवगुणी आहेत? ते त्यांच्याच पोथ्यात असलेले गुण अवलंबीत नसतील तरीही त्यांच्यात ब्राह्मण असल्याचा गर्व, अहंकार आहे की नाही? ते हिंदू राष्ट्रासाठी काम करतात, सत्तेत आहेत म्हणजे चातुर्वर्ण्यवादी आहेत, ती विकृती कायम ठेवण्यासाठी कार्यरत आहेत. ■ ■

---

## वाचकांचे मनोगत

बहुजन सौरभ

# आध्यात्म हे मुळात नसतेच

आध्यात्म हे मुळात नसतेच. ती भाषिक बडबड असते, जे मानसिक संभ्रम निर्माण करते. कारण ते अस्तित्वात असलेले नाकारते व नसलेले ( उदा. ईश्वर ) हे असल्याचा गोंडस ढिंढोरा पिटते. यालाच धर्म म्हणतात; जे मानसशास्त्राची सामाजिक किमया आहे. मानसशास्त्र हे विज्ञान आहे, हे मान्य केले तर धर्मही विज्ञान आहे, हे मान्य करावेच लागते. विज्ञान म्हणजे कृत्रिमता. जे जे कृत्रीम, ते ते विज्ञान. म्हणून आध्यात्म हे विज्ञान आहे व ते Absurd आहे. नैसर्गिकतेवर प्रयोग, प्रक्रिया व परिणाम करणार सार विज्ञानच असते. म्हणून विज्ञान आणि आध्यात्म अशी फारकत करणारे स्वतःच आध्यात्मिक असतात, ज्याला आपण Antispirutialism/आध्यात्मविरोधवाद असे सहज संबोधू शकतो. कारण Spirit हे चेतना असते व चेतना हे मानस असते. आध्यात्म व भौतिक अशी तुलना होऊ शकते. परंतु आध्यात्म व विज्ञान अशी तुलना हेच एक आध्यात्म आहे नैसर्गिकता नाही. निसर्ग आणि विज्ञान अशी तुलना ठिक आहे. निसर्ग हा कच्चामाल (Thesis) आहे तर विज्ञान हे प्रक्रिया(Antithesis)आहे. यातून जे समोर येते ते Synthesis म्हणजे कृत्रीम असते. ■ ■

– विनोद उलीपवार

# भावनांच्या वादळांचा एल्गार 'कविता मार्च' : इ. मो. नारनवरे



**नागपूर :** करुणासागर बहुउद्देशीय संस्थे मार्फत जागतिक महिला दिन, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृती, बीर समता सैनिक दल स्थापना दिन, महाड संग्राम क्रांती दिन, बाबूराव बागुल स्मृती, डॉ. गंगाधर पानतावणे स्मृती, कवी ग्रेस स्मृती, ग़ज़ल सम्राट सुरेश भट स्मृती, डॉ. यशवंत मनोहर जन्म, भाऊ पंचभाई जन्म, हृदय चक्रधर जन्म यांचे औचित्य साधून नटराज सभागृह, हिन्दी मोरभवन, सीताबर्डी, नागपूर येथे 'कविता मार्च' हा बहारदार कवी संमेलनाचा कार्यक्रम आयोजित केला होता .

'कविता मार्च' या कार्यक्रमात ज्येष्ठ आंबेडकरी कवी आणि गीतकार इ.मो. नारनवरे यांनी आपले मार्गदर्शन करतांना असे म्हटले की, 'आंबेडकरी कविता केवळ मनोरंजनाचा उपक्रम नसून नव्या युगाच्या प्रबोधनाची वाटचाल आहे.' 'कविता मार्च' या उपक्रमात सुमारे 37 कविंनी आपल्या बहारदार रचना ऐकवून एक नवा लोकशाहीचा लढा उभारला. यातून निष्कर्ष असा निघतो की, 'भावनांच्या वादळांचा एल्गार' कविता मार्च अशा प्रकारचे प्रबोधन कवी संमेलनाचे अध्यक्ष इ.मो. नारनवरे यांनी केले.

'कविता मार्च' या कार्यक्रमात करुणासागर बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रा. हृदय चगक्रधर यांचा मा. शालिक जिल्हेकर, इ.मो. नारनवरे, सरिता सातारडे, प्रज्ञा बाली, भीमराव गणवीर आणि इतर मान्यवरांच्या हस्ते जन्मदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. तसेच आदिम साहित्य संगितीचे अध्यक्ष मा. प्रकाश दुलेवाले यांच्या मंच संचालनामध्ये मान्यवर कवी शालिक जिल्हेकर, भीमराव गणवीर, सरिता सातारडे, प्रज्ञा वाली यांची प्रमुख उपस्थिती होती. सिद्धार्थ मेश्राम, हृदय चक्रधर, ताराचंद चव्हाण, हेमलता ढवळे, वैशाली धनविजय, विशाखा नकाशे, मधुकर बोरीकर, संजय गोडघाटे, संजय सायरे, माधुरी वसंत शोभा, प्रकाश बावनगडे, माणिकराव खोब्रागडे, प्रतिभा सहारे, रंगराज गोसावी, डॉ. भूषण भस्मे, चित्तरंजन चीर, जगदीश राऊत, चरणदास वैरागडे, प्रभू फुलझेले, रजनी फुलझेले, दीपक पंचभाई, धम्मपाल फुलझेले, अरविंद शेलारे, सुभाष मानवटकर इत्यादी कविंनी स्वातंत्र्य, न्याय, समता, बंधुता, स्त्रीभ्रूण हत्या, अन्याय अत्याचार, गुलामगिरी, थेरी गाथा, बुद्ध-फुले-आंबेडकर, सवित्रीबाई फुले, रमाई इत्यादी विषयावर संवेदनशील कविता ऐकवून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

'कविता मार्च' या कार्यक्रमात अशोक कुमार धमगाये, डोमाजी चापले, फकीरचंद्र तायडे, मधुकर गडकरी, दिनकर मलकवाडे, चंद्रशेखर शेंडे, दीपक नागदिवे, चोखोबाजी बनकर, दयाराम खंडारे इत्यादी जय मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची भूमिका प्रा. हृदय चक्रधर यांनी विषद केली. संचालन प्रकाश दुलेवाले यांन तर सचिव प्रा. दामोधर वानखेडे यांनी आभार मानले.

## थकबाकी वसुलीसाठी महावितरणचे संचालक मैदानात




**नागपूर :** आर्थिक वर्ष संपायला अवघे दोन दिवस शिल्लक असल्याने थकलेल्या वीजबिलांच्या वसुलीसाठी महावितरणच्या कर्मचा-यांसमवेत दस्तुरखुद्द महावितरणचे संचालक (संचालन) अरविंद भादीकर हे देखिल मैदानात उतरले असून शुक्रवारी (दि. 29) त्यांनी नागपूर शहरातील लष्करीबाग, टेका नाका, नयी बस्ती, चार खंबा, महाल या भागात सुरु असलेल्या थकबाकी वसुली मोहीमेत भाग घेतला. ग्राहकांनी आपले नियमित वीजबिल थकबाकीसह भरण्याचे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. थकबाकी वसुलीसाठी महावितरणने आक्रमक पवित्रा अवलंबित सर्वत्र थकबाकीदारा ग्राहकांकडे भेट देत वीज बिल भरण्यासाठि आग्रह करीत आहेत. थकबाकी वसुलीच्या या कामात कर्मचाऱ्यांना सदैव प्रशासन आपल्या सोबत आहे, ही भावना वृद्धिंगत व्हावी, यासाठी महावितरणचे संचालक (संचालन)अरविंद भादीकर, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता अमित परांजपे हे देखिल दिवसभर या मोहिमेत त्यांचे सोबत प्रत्यक्ष या मोहीमेत सहभागी झाले, यावेळी अरविंद भादीकर यांनी कर्मचाऱ्यांसमवेत संवाद साधून थकबाकी वसुलीचा आढावा घेत मुख्यालयाने ठरवून दिलेले वसुलीचे उद्दीष्ट 31 मार्च पर्यंत साध्य करण्याचे आवाहन केले.




### बोधीवृक्ष बुद्ध विहार, बजरंग नगर, नागपूर

अध्यक्ष ईश्वर कडबे 9422802252, सचिव भास्कर गणवीर रोज वंदना, सोमवार डॉ चांगदेव शेंडे हे बाबासाहेबांच्या दृष्टीकोणातून आर्थिक विचारावर प्रबोधन करतात. मंगळवार सायंकाळी बौद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथावर विश्लेषण केले जाते . बुधवार सायंकाळी विहाराचे अध्यक्ष ईश्वर कडबे धम्मप्रबोधन,शुक्रवार सायंकाळी 7 वाजता भदंत धम्मसारथी बुद्ध धम्म आणि बाबासाहेबांच्या विचारांवर प्रबोधन करतात,शनिवार महिलांचे चर्चासत्र, महिलांद्वारे आयोजित केले जातात. भास्कर गणवीर, 7796361086 अभ्यासिकाचे नावधम्म संकल्प

संवाद मित्र, श्रीराम बनसोड, 918208617748

## महत्वाचे

### 25 मे ते 1 जून निवासी संस्कार व पालि भाषा प्रशिक्षण शिबीर

**नागपूर :** संत गाडगेबाबा आश्रम व बुध्द विहार समन्वय समिती द्वारा आयोजित बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिर व पालि भाषा प्रशिक्षण निवासी शिबिर रविवार ते रविवार 25 मे ते 1 जून, 2025शांतीवन, चिंचोली (फेटरी) पर्यटन स्थळ नागपूर, महाराष्ट्रयेथे आयोजित करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी अशोक सरस्वती बौध्द 8530980741 प्रा. डॉ. प्रमिला चींचखेडे 8788607323 नागपूर यांनी सांगितले आहे.
मुख्य संयोजक सतीश गायकवाड, 9970083437 बबिता गायकवाड, 9665614341 मलकापूर, बुलढाणा, पालि भाषा निवासी प्रशिक्षक, आचार्य राजेंद्र भालशंकर, नाशिक हे आहेत.

### साखळी उपोषण 180 वा दिवस




**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क बचाव कृती समिती नारा नागपूर येथे दि. 30 -03-25- साखळी उपोषणाचा 180 वा दिवस आहे. साखळी उपोषणाला बसलेले कार्यकर्ते जिजा रामटेक,अर्चना पारील रेखा खोब्रागडे,बेबी गजभिये, विजया पाटील, वनिता वालदे, चंदा वाघमारे,शंकरराव सोमकुवर, यमुना रामटेके आदी सहभागी झाले आहेत.

### गोंडवाना विद्यापीठातील विद्यार्थी गळती कशामुळे?

**चंद्रपूर :** चंद्रपूर व गडचिरोली या दोन जिल्ह्यांतील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरांत जात असल्याने गोंडवाना विद्यापीठातील विद्यार्थीसंख्येला गळती लागली आहे. मागील दोन वर्षांत विद्यार्थी संख्या 20 हजाराने कमी झाली आहे. त्यामुळे आता शाळांपाठोपाठ गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांनाही विद्यार्थ्यांचा शोध घ्यावा लागत आहे. चंद्रपूर व गडचिरोली या दोन जिल्ह्यांसाठी 2011 मध्ये गोंडवाना विद्यापीठाची निर्मिती करण्यात आली.

## घातपाताच्या संशयावरून बोलेरो गाडीसह दोघांना अटक



**पवनी :** घातपात करून दखलपात्र गुन्हा घडविण्याच्या उद्देशाने बोलेरो वाहनासह लपून बसलेल्या दोघांना पवनी पोलिसांनी रोहना गावच्या शेतशिवारात अटक केली. यातील आरोपींची नावे मंगेश यादवराव झिंगरे(27 वर्ष) व अजय श्रीराम नान्हे(24 वर्ष) दोन्ही राहणार कारगाव तह. भिवापूर जि. नागपूर अशी आहेत. पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार गुरुवारी रात्री पोलीस पथक पेट्रोलिंग करीत असतांना रोहना येथील शेतशिवारात निर्जन जागी बोलेरो गाडी क्र. एम.एच. 40 सीडी 8642 दिसून आल्याने पोलिसांनी धाड टाकली. चौकशी दरम्यान दोन व्यक्ती आढळून आले. सदर व्यक्ती लपून बसले असल्याने विचारणा केली असता पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. यावरून पोलिसांना सदर इसम सुर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत एखाद्या मोठ्या घातपाताच्या उद्देशाने लपून बसले असण्याचा संशय आला. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून एक बोलेरो, 4 पावडे, 2 जर्मन व 3 प्लॅस्टिकचे घमेले, 1 प्लॅस्टिक चुंगळ्यांची ताळपत्री असा एकूण 5,00450 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदरची कार्यवाही पोलीस निरीक्षक निलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनात पोलीस पथकाने केली असून महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 122 अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पुढील तपास परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक यशोदा पाटील करीत आहेत.

### गुप्तधन शोधणाऱ्या टोळीचा संशय!

रोहना येथील घटनेत जप्त केलेल्या साहित्यावरून गुप्तधन शोधणाऱ्यांची टोळी पवनी तालुक्यात सक्रिय झाली आहे का? अशा विविध प्रश्नांच्या शंकेची चर्चा जनतेत व्यक्त केल्या जात आहे. अनेक ठिकाणी छुप्या पद्धतीने गुप्तधन शोधण्याचे प्रकरणे घडत असतात. यात काही ठिकाणी पोलिसांकडून कारवाया देखील झाल्या असल्यामुळे साहजिकच रोहना सारख्या जंगल भागात सदर घटना घडल्याने शंकेला पेव फुटले आहे

## स्त्रीभूषण रमाई आंबेडकर संस्था कडून मुंबई मंत्रालयात निवेदन

**मुंबई :** स्त्रीभूषण रमाई आंबेडकर संस्था कडून मुंबई मंत्रालयात विविध मागणी संदर्भात निवेदन देण्यात आले आहे. मुंबई येथे इंदुमिलच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्यदिव्य स्मारकांत त्यांच्या पत्नी रमाई यांचा पुतळा बसविण्यात यावा व त्यांच्या जिवनावरील कायमस्वरुपी चित्र प्रदर्शनी लावण्यात यावी.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई आंबेडकर यांच्यावर 27 मे 1935 रोजी मुंबईच्या वरळी स्मशान भूमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या स्थळावर रमाईचे स्मारकाच्या कामाची सुरुवात तातडीने करून सरकारने वचनपूती करावी.

मुंबईतील परड बी.आय.टी. चाळ क्र.1 खोली क्र. 50 व 51 या दोन खोल्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कुटुंबियांचे 1912 ते 1934 असे प्रदीर्घ वास्तव्य होते. या ठिकाणी सरकारने घोषित केल्याप्रमाणे स्मारकाची निर्मिती तातडीने सुरू करावी.

दादर रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर टर्मिनल असे नामकरण करण्यात यावे.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बालपण गेले. तेथील त्यांच्या घराची वास्तु आता दुर्लक्षित आहे. या वास्तूचे जतन करण्यासाठी स्मारक घोषित करून तातडीने काम सुरू करावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कुटुंबियांचे मुळ गाव आंबडवे व रमाई आंबेडकर यांचे जन्मगाव वणंद (जिल्हा रत्नागिरी) येथे विकासकार्य करावे व पर्यटन क्षेत्र घोषीत करावे. सातारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वास्तव राहिलेल्या ठिकाणी स्मारकाचे कार्य तातडीने सुरु करावे.डॉ. बाबासाहेच आंबेडकर यांच्या मातोश्री भिमाई यांची जन्मभूमी आंबेटेंबे, ता. मुरबाड जि. ठाणे येथे त्यांचे निवास असलेल्या ठिकाणी भिमाई स्मारक उभारण्यात यावे.पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निवास स्थानाजवळील प्लॉट क्र. 29 ते 34 चो मोकळी जागा अधिग्रहीत करून स्मारक निर्मिती करावी. भीमा-कोरेगाव स्मारकाचे सौंदर्याकरण सरकारच्या घोषणेनुसार करण्यात यावे. रमाई आंबेडकर यांचे जीवनचरित्र इयत्ता 9वी ते 12 च्या शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावे.

स्त्रीभूषण रमाई आंबेडकर संस्थेचे अध्यक्ष राजकुमार वंजारी, रमाई आंबेडकर यांची भाची शुभांगी धोत्रे/वाघचौरे, बहुजन धम्ममिशनचे अध्यक्ष गौतम मोरे, सामाजिक कार्यकर्ते विजेंद्र वाघचौरे, मयुर शिर्के आदींनी निवेदन दिले आहे

## विधायक विनोद अग्रवाल यांनी वीज विभागाला दिला 24 तासांचा अल्टीमेटम



**गोंदिया :** शेतकऱ्यांद्वारे वीज पुरवठ्यात अनियमिततेविरोधात कामठा येथे आयोजित आक्रोश मोर्चा आणि धरणा आंदोलनात आज विधायक विनोद अग्रवाल यांनी सहभाग घेतला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या ऐकल्या आणि वीज विभागाच्या अधिकाऱ्यांना 24 तासांचा अल्टीमेटम दिला.

शेतकऱ्यांनी मांडलेली मुख्य समस्या आमगाव येथील 50 MVA क्षमतेच्या ट्रांसफार्मरचे खराब होणे, ज्यामुळे या क्षेत्रातील वीज पुरवठा प्रभावित होऊ लागला होता. विधायक विनोद अग्रवाल यांनी उच्च अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्वरित दुसरा ट्रांसफार्मर उपलब्ध करायला सांगितला आहे.

त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी आणि त्यांच्या भावना अधिकाऱ्यांसमोर मांडल्या आणि वीज विभागाने या समस्येचे तात्काळ निराकरण करणे आवश्यक असल्याचे सांगितले. विधायक यांनी अधिकाऱ्यांना 24 तासांच्या आत समाधान सुनिश्चित करण्याचे आणि क्षेत्रातील वीज पुरवठा खंडित होऊ नये याची पूर्ण जबाबदारी घेण्याचे निर्देश दिले.

विनोद अग्रवाल यांनी घटनास्थळी वीज विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावले आणि त्यांना निर्देश दिले की, शेतकऱ्यांकडून कोणत्याही प्रकाराची अतिरिक्त रक्कम मागितल्यास संबंधित अधिकऱ्यांना त्वरित निलंबित केले जाईल. त्यांनी असेही सांगितले की, ज्या ठिकाणी डीपी (डिस्ट्रीब्युईशन पॉइंट) ची क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे, तिथे तातडीने कार्यवाही करावी.

विधायकांनी शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची माहिती तहसीलदारांना दिली असून, या नुकसानीचे पंचनामे तयार केले जात आहेत. तसेच, या नुकसानीसाठी शासनाकडून भरपाई मिळवण्यासाठी ते सर्वतोपरी प्रयत्न करतील. शेतकरी आंदोलनाने वीज पुरवठ्यात सुधारणा होईल अशी आशा व्यक्त केली असून, विधायक विनोद अग्रवाल यांच्या सक्रिय हस्तक्षेपामुळे या समस्येचे लवकर निराकरण होईल अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

## निधन वार्ता

### सावित्रीबाई चंद्रभान सवाईतुल



**नागपूर :** सावित्रीबाई चंद्रभान सवाईतुल (भिवापूर), वय - 92 वर्ष, रा. प्लॉट नं.03, सुजाता ले-आऊट, जुना सिमेंट रोड, भामटी, नागपुर, यांचा दिर्घ आजाराने दि. 30/03/25 रोजी सकाळी 8:30 वाजता निधन झाले. अंत्य संस्कार दि. 31/03/25 रोजी सकाळी 10 वाजता अंबाझरी घाट, नागपूर येथे होणार आहे.

## महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेतर्फे पेन्शन संवाद मेळावा




**नागपूर :** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने नागपूरच्या संताजी सभागृहात पेन्शन संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. राज्यातील सरकारी कर्मचारी जुनी पेन्शन योजना (ओपीएस) पुन्हा लागू करण्याच्या मागणीवर ठाम आहेत. मात्र, सध्या लागू असलेल्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस), सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (आरएनपीएस) आणि केंद्र सरकारच्या युनिफाइड पेन्शन स्कीम (यूपीएस) याबाबत कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम आहे. या मेळाव्यात जुनी पेन्शनची मागणी तसेच शिक्षण सेवक पद रद्द करण्याचा मुद्दा जोरदारपणे मांडण्यात आला.

जुनी पेन्शन योजना पुनर्स्थापनेसाठी कर्मचारी आक्रमक राज्यात नोव्हेंबर 2005 नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना एनपीएसमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. मात्र, त्यांना आरएनपीएस आणि यूपीएस या योजना निवडण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. या योजनांविषयी स्पष्टता नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे याबाबत सखोल माहिती देण्यासाठी हा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला.

**शिक्षण सेवक पद रद्द करण्याची मागणी**

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण सेवक पद अन्यायकारक आणि शोषण करणारे असल्याचा आरोप केला. सन 2019 व 2024 मध्ये झालेल्या शिक्षक भरतीत सरासरी वय 35 असलेल्या उमेदवारांना केवळ 23 वर्षांचा सेवाकाल मिळतो. संघटनेने स्पष्ट केले की, दिल्लीसारख्या छोट्या राज्यातही अकुशल मजुरांना 18,000 रुपये वेतन दिले जाते, मात्र महाराष्ट्रातील डी.एड., बी.एड. उत्तीर्ण शिक्षकांना अल्प मानधनावर काम करावे लागते. राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रोबेशन कालावधीत संपूर्ण वेतन मिळाले पाहिजे, असे मत मांडण्यात आले. त्यामुळे शिक्षण सेवक पद त्वरित रद्द करण्याची आग्रही मागणी संघटनेकडून करण्यात आली. नव्या पेन्शन योजनेच्या पर्यायासाठी मुदतवाढ राज्य शासनाने आरएनपीएस योजनेत सहभागी होण्यासाठी कर्मचाऱ्यांना 31 मार्च 2025 पर्यंत मुदत दिली होती, ती वाढवून 31 मार्च 2026 करण्यात आली आहे.

## न्यू प्रगती शैक्षणिक संस्था कोपरी ठाणे आणि प्रणव खाडे निर्मित लेखक दिग्दर्शक आनंद खाडे बाप शॉट फिल्मचा शो प्रदर्शित

**ठाणे :** बापाने किती ही संकटाचा सामना करून रात्रंदिवस मेहनत करून घर बांधून मुलाचे शिक्षण व लग्न केले तरी लग्न झाल्या नंतर मूल विचारतात तुम्ही आमच्या साठी काय केले? नंतर त्यांची वृद्धाश्रमात केली जाते. असा हा बाप लोकांसमोर उघड होऊन डोळ्यातून अश्रु काढू शकत नाही.त्यांच्या कष्टाची त्यागाची आणि जिद्धीने उभा केलेल्या संसाराची कोणी घेत नाही. त्यावेळी नातलग व समाज त्याच्या मदतीला उभा राहत नाही.अशा ह्या बापाची शॉट फिल्म लेखक दिग्दर्शक आनंद खाडे यांनी बनवली तिचा खास शो दिनांक 26 मार्च 2025 ला मंगला हायस्कूल कोपरी ठाणे येथे मान्यवरांच्या उपस्थित प्रदर्शित करण्यात आला. कुमारी अनीता दिनकर खरात संचालिका न्यू प्रगती शैक्षणिक संस्था कोपरी ठाणे यांच्या अध्यक्षते खाली प्रणव खाडे निर्मित लेखक दिग्दर्शक आनंद खाडे बाप शॉट फिल्मचा विशेष शो चे आयोजन करण्यात आले होते.बाप शॉट फिल्म मध्ये काम करणाऱ्या सर्व कला करांचे मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक मिलिंद कांबळे यांनी केले तर उत्तम सूत्रसंचालन चंद्रकांत सोनवणे यांनी केले.प्रणव खाडे निर्मित लेखक दिग्दर्शक आनंद खाडे बाप शॉट फिल्म कुटुंबासह सर्वांनी आवर्जून पाहावी असे मान्यवरांनी जाहीर आवाहन केले.

नागपूर ताज फर्निचर ॲण्ड रिपेअर



: संपर्क :
मो. 9511632051

## आंबेडकराईट एज्युकेटर्स ग्रुपतर्फे गुगल मीट वर ऑनलाईन मार्गदर्शन

**नागपूर :** सर्वसाधारण पालकांना परवडेल इतक्या कमी खर्चात अमेरिका,जर्मनी,कॅनडा, ऑस्ट्रेलिया,फ्रांस,च यासारख्या देशांमध्ये 12 वी नंतरचे Engineering, MBBS, BSc, BBA शिक्षण सहज घेता येते. तसेच ग्रॅज्युएट झालेल्या विद्यार्थ्यांकरिता पुढील MBA,MTech/MS,PhD, ई उच्चशिक्षण घेऊन तिथे चांगले करिअर करता येते. परदेशात शिक्षणाचा खर्च किती? स्कॉलरशिप काय आहेत व प्रक्रिया कशी असते? हे समजून घेण्याकरिता AEG Maharashtra तर्फे इच्छुक विद्यार्थी आणि पालकांना विशेष माहिती व मार्गदर्शन कार्यक्रम रविवार दि. 06.04.2025 ला दु.1.00 वाजता गुगल मिट वर online घेण्यात येत आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्याकरिता खालील गुगल फॉर्म भरून रजिस्ट्रेशन करावे. https://forms.gle/N6mR&HdnYZBqEVTB| या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे कमिशनर व सचिव राहिलेले IAS Officer आर.के. गायकवाड सर हे पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.
दि- 06.04.2025,रविवारच्या कार्येक्रमाची मिटिंग लिंक : https://meet.google.com/ath-azjf-qju
तरी ही उपयुक्त माहिती सर्व नातेवाईक, मित्र मंडळी, शिक्षक, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांना forward करावी, ही विनंती भूषण रामटेके.

## दंगलीला कारणीभूत विहिंप व बजरंगदल आंदोलकांवरही कारवाई व्हावी!




सामाजिक कार्यकर्ते व संघटनांची मागणी

**नागपूर :** विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने केलेल्या आंदोलनातील अनुचित प्रकाराची त्वरित योग्य ती दखल घेतली न गेल्याने नागपूर शहरात दंगलीचा प्रसंग उद्भवला. म्हणून दंगलीला कारणीभूत या आंदोलकांवर तसेच बघ्याची भूमिका घेणाऱ्या संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व कार्यकर्ते यांनी एका पत्रपरिषदेत केली.

पूर्व परवानगी घेऊन पोलिस आयुक्त रवींद्र सिंगल यांना दंगलीच्या पार्श्वभूमीवर निवेदन सादर करण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळास भेट नाकारली गेल्याने याचा निषेध म्हणून ही पत्रपरिषद घेण्यात आली.

नागपूर शहरात बहुभाषिक, बहुधार्मिक व बहुप्रांतिय लोक मोठ्या संख्येने राहत असूनही येथील शांततेच्या व सलोख्याच्या संबधांना यापूर्वी कधीही गालबोट लागले नाही.परंतु दंगलीच्या अप्रिय घटनेमुळे या नावलौकिकास बाधा पोहचली आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. दंगलीचे बळी ठरलेले मृतक इरफान अन्सारी यांचे कायद्याने मृत्यू पूर्व बयान नोंदविणे आवश्यक होते.परंतु ते घेतले गेले नाही. तसेच जमावाने त्यांचा बळी घेतल्यानंतरही या प्रकरणात जेमतेम लोकांना नाममात्र अटक झाली आहे, असे सामाजिक व राजकीय कार्यकर्ते मिलिंद पखाले यांनी पत्रपरिषदेत सांगितले. याठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या विरोधात जाऊन बुलडोझरने घर पाडण्याची कारवाई करण्यात आली, याकडे लक्ष वेधून या कारवाईचाही निषेध करण्यात आला. चित्रपटाचा जनतेच्या भावना भडकविण्यासाठी वापर केला जात आहे.छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर अशाप्रकारे सामाजिक वातावरण कलुषित करण्यात आले,असे निवेदनात नमूद केले आहे.

पत्रपरिषदेला मिलिंद पखाले, छाया खोब्रागडे, सुषमा भड, सुनील सारिपुत्त, सुधांशू मोहोड, अपेक्षा दिवाण,जया देशमुख, विशाल वानखेडे, कल्पना मेश्राम, विजय बाबुळकर, डॉ. बिना नगराळे, आशा गोपालपूरे, पुंडलिक तायडे, रूपेश कांबळे, रेशमा कांबळे, नंदा देशमुख आदी उपस्थित होते.

जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता
संपर्क
९३२५६२९६३५

स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.
मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648